Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,
ई बालभारती शेजारी, आगारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे/तातडीचे

क्र.रा.मं./परीक्षा-७/१९८० 28824
पुणे ४११ ००४.
दिनांक- ११/०५/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत.

संदर्भ:- १. विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांचे जा.क्र/पुविमं/उमा–अ/३६६७ दि.०६/०५/२०२६ चे पत्रासोबत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा पुणे यांचे पत्र क.जिक्रीअ/ग्रेसमाप्र/सन २०२५–२६/का.४/, दि.०५/०५/२०२६
२. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा पालघर यांचे पत्र क.जिक्रीअ/शिप्रमांणपत्र/२०२६–२७/३५६, दि.०६/०५/२०२६.
३. मा.डॉ.हेमंत सावरा, लोकसभा सदस्य, पालघर मतदार संघ, महाराष्ट्र यांचे दिनांक ०६/०५/२०२६ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांच्या क्रीडा सवलत गुणांच्या प्रलंबित प्रस्तावांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी/शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी क्रीडा प्रस्ताव आपले सरकार पोर्टलवर तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे विहीत मुदतीत सादर केले असतानाही काही खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे गुण मिळाले नसल्याच्या तकारी विभागीय मंडळाकडे येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी/शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी विहीत मुदतीत क्रीडा प्रस्ताव आपले सरकार पोर्टलवर तसेच संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर केलेले होते, तथापि, त्रुटी अथवा तांत्रिक कारणांमुळे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे विहीत मुदतीत प्राप्त झाले नसल्याने विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देण्यात आलेले नाहीत. अशा प्रस्तावांची विभागीय मंडळ स्तरावर खातरजमा करुन सदर प्रस्तावासंदर्भात संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून निश्चितीकरण करुन घ्यावे व जे विद्यार्थी गुण मिळण्यास पात्र आहेत अशा खेळाडू विद्यार्थ्यांना नियमानुसार क्रीडा सवलतीचे गुण देण्याबाबतची उचित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
(मा.अध्यक्ष, राज्य मंडळ यांच्या मान्यतेने)

Mali
(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे–०४.

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/ 2222
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक-13/ ०५ /२०२६

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महावि
मुंबई /बृन्हमुंबई /ठाणे /पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

.लघर जिल्हा
.तर विभाग, मुंबई.
.ादिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.
.ील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.